'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई


संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

## 'त्या' प्रकरणी शरद पवारांची चौकशीची मागणी

**नवी दिल्ली ।** एखादी गोष्ट गंभीर असल्याचं मुख्यमंत्री सांगत असतील तर त्याबाबत चौकशी करून वास्तव चित्र त्यांनी समाजासमोर ठेवलं पाहिजे. त्यामुळे ते काम त्यांनी करावं, अशी आमची अपेक्षा आहे,'' असं पवार म्हणाले. कुटुंबातील एका सदस्यावर जमीन गैरव्यवहाराचे आरोप झाल्याबद्दल पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. मात्र ''प्रशासन, राजकारण, कुटुंब आणि कुटुंबप्रमुख या गोष्टींमध्ये फरक आहे. कुटुंबप्रमुख म्हणून म्हणाल तर आम्ही एकमेकांविरुद्ध निवडणुका लढवल्या आहेत.

* वर्ष ३ रे * अंक ५ वा * रविवार दि. ०९ नोव्हेंबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## नवी कोरी पुस्तकं



**काव्यभान**
: लेखकाचे नाव :
**रवींद्र कांबळे**
किंमत रु. : १००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**



**सप्तरंगी एकांकिका**
: लेखकाचे नाव :
**दत्ताराम गिलाणकर**
किंमत रु. : १२०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# तो व्यवहार रद्द करण्याची तरतूदच कायद्यात नाही...

**पुणे :** येथील कोरेगाव पार्कमधील तब्बल २ हजार कोटी रुपयांच्या जागेवर पार्थ पवार आणि त्यांच्या अमेडिया कंपनीने सरकारला फसवून डल्लाच मारल्याचा मोठा घोटाळा उडकीस आला.

मात्र या प्रकरणी सरकारकडून हा व्यवहार रद्द करण्याची कोणतीही तरतूद कायद्यात नसल्याने शेवटी अमेडिया कंपनीच 'कॅन्स्लेशन डिड' देऊन व्यवहारातून माघार घेणार असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. व्यवहार थांबवून चक्क माघार घेण्यासाठी अमेडिया कंपनीकडून कायदेशीर प्रक्रिया केली जात आहे. जुने, खोटी कागदपत्रे जोडून, सरकारचा मुद्रांक शुल्क बुडवून शेकडो कोटींची जागा घेतल्याचा प्रकार समोर आला होता. किरकोळ भावात घेणाऱ्या पार्थ पवार आणि त्यांच्या अमेडिया कंपनीला मोठा दणका बसलाय. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले. (पान २ वर)

# १८०० कोटींची जमीन ३०० कोटीत

## पार्थ पवारांच्या कंपनीचा घोटाळा । अजित पवार अडचणीत

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी पुण्यातील कोरेगाव पार्कमधील १८०० कोटींची ४० एकर जमीन अवघ्या ३०० कोटींमध्ये खरेदी केली. गंभीर बाब म्हणजे या व्यवहारात पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीला तब्बल २१ कोटी रुपयांची स्टँप ड्युटी माफ करण्यात आली आहे. यासाठी मुद्रांक शुल्क केवळ ५०० रुपये भरल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची दखल घेत चौकशी समिती नियुक्त केली. राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी समिती काम करेल. तसेच या प्रकरणी तहसीलदार, उपनिबंधक तसेच एका तलाठ्याला निलंबित करण्यात आले.



**तहसीलदार, उपनिबंधक निलंबित**

**मुख्यमंत्र्यांकडून चौकशी समिती**

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केलेली जमीन ही 'महार वतन' ची आहे. या जमि नीला ऐतिहासिक आणि कायदेशीर महत्त्व आहे. महार वतन ही ब्रिटीश काळात आणि त्याआधीही गावांमध्ये एक (पान २ वर)

## मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे : सुप्रिया सुळे

महाराष्ट्रात काय चालले आहे, दर एक दिवसा आड नवीन घोटाळा उघडकीस येत आहे. जैन बोर्डिंग प्रकरणाचा घोटाळा नुकताच उघड झाला होता. विरोधक तर बोलतच आहेत. पण महायुतीमधील मित्र पक्षही एकमेकांविरोधात भूमिका घेत कागद पुरवत आहेत. मुख्यमंत्र्यांनी यात उत्तर दिले पाहिजे. तहसीलदार म्हणतात त्यांनी सही केलेलीच नाही. तर मग व्यवहार झाला कसा? पार्थ पवारांचा या प्रकरणात काही संबंधच येत नाही अशी पाठराखण त्यांनी केली आहे.

# जरांगे-मुंडे यांचे आरोप-प्रत्यारोप

## मुंडे यांच्याकडून नार्को टेस्ट तपासाची मागणी

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेते मनोज जरांगे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जीवे मारण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप केल्यानंतर या प्रकरणाने महाराष्ट्राच्या राजकीय पटावर मोठी खळबळ उडाली आहे. जरांगे यांच्या आरोपानंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत आरोपांचे ठाम खंडन करत स्वतः ची नार्को टेस्ट, ब्रेन मॅपिंग आणि संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआयकडे करण्याची मागणी केली. मात्र, यानंतर पुन्हा एकदा जरांगे पाटील माध्यमांसमोर आले आणि ऑडिओ क्लिप ऐकवत मुंडेंवर पलटवार केला. धन्या म्हणून उद्धृत करत त्यांनी मुंडेंच्या प्रत्युत्तरावर उपहास केला. उद्या (८ नोव्हेंबर) मी गृहमंत्रालय, कोर्ट, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि कलेक्टर (पान २ वर)

# कृषी कर्जमाफी होणारच : कृषीमंत्री भरणे

## कृषीमंत्र्यांच्या हस्ते कृषी महोत्सव २०२५ चे शानदार उद्घाटन

**कोळपेवाडी :** कधी दुष्काळ पडतो तर कधी गारपीट होते आणि शेतकऱ्याचे उत्पन्न वाढलं की, बाजारभाव पडतात. शेतकरी अडचणीत आलेले आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणी काय असतात याची मला जाणीव आहे. मी पण शेतकऱ्याचाच मुलगा आहे, अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला मदत नाही तर सहकार्य केले पाहिजे. शब्द दिल्याप्रमाणे कृषी कर्जमाफीचा निर्णय घेण्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सकारात्मक आहेत. त्यासाठी



नेमलेल्या समितीचा अहवाल आठवड्यामध्ये एप्रिल महिन्याच्या पहिल्या शासनाला सादर होईल, (पान २ वर)






२०२५ दिवाळी च्या हार्दिक शुभेच्छा!

आशयसंपन्न लेख, कथा आणि कविता यांची मेजवानी घेऊन आला आहे
**शब्दालय दिवाळी अंक २०२५**
वितरण/विक्रीसाठी उपलब्ध...

**विशेष लेख**

**कितीही पुढारलो, तरी आदिबंध आदिम संस्कृतीचेच!**
मुकुंद कुळे / ४
**संस्कृतींच्या प्रवाहांचे घाट**
अंजली चिपलकट्टी / २५
**म. सयाजीरावांचा मुदबकखाना – संस्कृतिसमन्वयाची प्रयोगशाळा**
चिन्मय दामले / ३८
**आदिवासी संस्कृती व आपण**
प्राची वैद्य-दुबळे /५१
**वारसा आणि प्रवाह**
नीरजा पटवर्धन / ७६
**नास्तिकता आणि बहुसांस्कृतिकता**
अभिजित देशपांडे / ८४
**संस्कृतिसंकर आणि भारतीय दृश्यकला**
मंगेश नारायणराव काळे / ९५
**नाळ या मातीतली तुटलेली नाही**
कामिल पारखे / ११३
**संस्कृती : स्थलांतराच्या नजरेतून**
निळू दामले / १३२
**महाराष्ट्रातल्या मुद्रणतंत्राचा उदय : संस्कृतिसंकर आणि महाराष्ट्राचं समाजकारण**
नीतीन रिंढे / १३८
**गाव, गोधडी आणि गांधी**
अभिधा निफाडे / १५६
**मंदिर-मशिदींचे शहर : मालेगाव**
विनोद गोरवाडकर / १७०

**कथा**

**अमरनाथची आई**
मूळ हिंदी कथा : जितेंद्र भाटिया
अनुवाद : जयप्रकाश सावंत / १५
**रुकार**
हिनाकौसर खान / ६०
**एकाकी**
निहार सप्रे / १४६
**जिवट दोरवा**
सुचिता घोरपडे / १६२

**ललित**

**वेडी माया वाया गेली!**
मधुकर धर्मापुरीकर / ९०
**दूर का राही**
प्रतिमा कुलकर्णी / १२४
**ठेविले अनंते राहू नये तैसेची**
उदय कुलकर्णी / १५२
**मनविसाव्याचा श्रावणझोका**
सरिता सोमाणी / १७८

**कविता / १८३ ते १९९**
कल्पना दुधाळ । सुचिता खल्लाळ । नीलकंठ कदम । मनीषा उगले । सारिका उबाळे । संजय कृष्णाजी पाटील । अरुण शेवते । नम्रता फलके । संजय पाटील । लता थोरात । हर्षदा सुंठणकर । भगवान निळे । प्रशांत असनारे । व्यंकटेश चौधरी । स्वप्निल चव्हाण । तुकाराम खिल्लारे । प्रमोदकुमार अणेराव.

शब्दालय पुस्तकवारी – पुस्तकांची वारी... आपल्या दारी...
दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
90 11 20 1414

| अंकाचे नाव | किंमत रुपये |
|---|---|
| अनुभव | २५०/- |
| आश्लेषा | २५०/- |
| अनघा | ३००/- |
| अक्षरदान | ३००/- |
| अक्षर * | ३५०/- |
| अहेर | २५०/- |
| आनंदघन | ३००/- |
| चंद्रकांत | ४००/- |
| चौफेर समाचार | ५००/- |
| दीपलक्ष्मी | ३६०/- |
| दीपावली | ३५०/- |
| अक्षरधारा | ३५०/- |
| गंधाली | ३६०/- |
| हंस | ४५०/- |
| कथाश्री | ४००/- |
| किस्त्रीम | ३००/- |
| शब्दगांधार | २५०/- |
| स्वरप्रतिभा | २५०/- |
| शब्द शिवार | ३००/- |
| व्यासपीठ | १५०/- |
| शब्दालय | ३५०/- |
| व्हाईट स्पेस | २००/- |
| चांगुलपणाची चळवळ | २००/- |
| अंतरंग | २००/- |
| आनंद तरंग | २५०/- |
| चतुरंग अन्वय | ३००/- |
| अक्षर भेट | १५०/- |
| पृथा | ३००/- |
| शब्दाई | ३००/- |
| निनाद | ३००/- |
| सारांश | २००/- |
| आवाज | ४५०/- |
| मार्मिक | १२०/- |
| दिवाळी आवाज | ३८०/- |
| धमाल धमाका | ३००/- |
| फिरकी | २००/- |
| हास्य धमाल | ३००/- |
| जत्रा | ३५०/- |
| मोहिनी | ४५०/- |
| महाराष्ट्राची जत्रा | ३००/- |
| प्रभात | २००/- |
| श्यामसुंदर | ३००/- |
| रविवारची ध. जत्रा | २५०/- |
| भन्नाट | १५०/- |
| गुंफन | २००/- |
| टिंगल टवाळी | २२०/- |
| विनोदी कथा | २२०/- |
| विनोद वल्ली | २२०/- |
| आला रे आला | २२०/- |
| हा . हा . हा | २५०/- |
| सुभाषित | २५०/- |
| सुहास्य जत्रा | ३००/- |
| हास्यानंद | २५०/- |

| | |
|---|---|
| कालनिर्णय* | ३००/- |
| ललीत | ३००/- |
| लोकमत दीपोत्सव* | ३९९/- |
| लोकसत्ता* | २००/- |
| लोकप्रभा* | ५०/- |
| मेनका | ३५०/- |
| मौज | ४००/- |
| महाराष्ट्र टाईम्स* | २००/- |
| निहार | २००/- |
| पद्मगंधा | ४००/- |
| पुरूष स्पंदन | ३००/- |
| पुरूष उवाच | २००/- |
| प्रपंच | ३५०/- |
| पुढारी * | ३००/- |
| ऋतुरंग | ३००/- |
| रागिणी | २५०/- |
| साधना | २००/- |
| केसरी | १५०/- |
| सत्याग्रही | २००/- |
| संस्कृती | ३००/- |
| मुक्त शब्द | ३५०/- |
| अक्षरलीपी | २५०/- |
| एकमेव वेगळा | २५०/- |
| अक्षर मुद्रा | २५०/- |
| अनुराधा | ३००/- |
| अलका | २७०/- |
| अनुराग | २७०/- |
| गृहलक्ष्मी | ३२०/- |
| गृहशोभिका * | ९०/- |
| माहेर | ३५०/- |
| मानिनी | ३५०/- |
| मिळून साऱ्याजणी | १००/- |
| दीर्घ कथा | २००/- |
| श्री व सौ | २००/- |
| सुवासिनी | ३००/- |
| विपुलश्री | ३५०/- |
| वसुधा | २७०/- |
| सासर माहेर | २५०/- |
| गृहशोभा | १५०/- |

| | |
|---|---|
| शिवतेज | १००/- |
| शिवस्पर्श | १००/- |
| साप्ताहिक सकाळ* | २००/- |
| सामना * | १५०/- |
| साहित्य शिवार | २००/- |
| साहित्य लोभस | १५०/- |
| संयम | १८०/- |
| उत्तम अनुवाद | ४००/- |
| वाघुर | ३५०/- |
| वसंत | ३००/- |
| वेदांतश्री | ३००/- |
| जडण घडण | २५०/- |
| चौफेर साक्षीदार | २५०/- |
| साहित्यरंजन | २५०/- |
| पद्मरत्न | ४००/- |
| मनोकल्प | ३००/- |
| साहित्य स्वानंद | १५०/- |
| मैत्र | ३००/- |
| मेहता मराठी ग्रंथ जगत | १५०/- |
| समदा | १८०/- |
| वसा | ३५०/- |
| सकाळ मनी * | १५०/- |
| एकता | २५०/- |
| अक्षर वेध | ३९५/- |
| रत्नावली | २५०/- |
| लयभारी | ३५०/- |
| अक्षरधन | २४०/- |
| सृजन संवाद | ३५०/- |
| समिधा | २००/- |
| इन साईट | २५०/- |
| ब्रह्मज्ञान | २००/- |
| भविष्य | १५०/- |
| भविष्य निर्णय | २००/- |
| धनुर्धारी | ३००/- |
| ग्रहांकित | ४००/- |
| गृहबोली | २८०/- |
| ग्रहसंकेत | २००/- |
| ज्योतिष ज्ञान | ३५०/- |
| ज्योतिष तंत्र आणि मंत्र | ३००/- |
| मंत्र तंत्र तोडगे | २५०/- |
| वार्षिक राशी भविष्य | २५०/- |
| ग्रहवेध | २५०/- |
| रेकी | २००/- |
| आनंदी वास्तू तोडगे | २२०/- |

| | |
|---|---|
| आपले छंद | ४००/- |
| अर्थवेध | ३००/- |
| चपराक | ४००/- |
| ग्राहकहित | २५०/- |
| अपेक्षा | २००/- |
| मन:शक्ती | २००/- |
| पुणे प्रतिष्ठान | २००/- |
| नरवीर | १५०/- |
| संगम | २००/- |
| हेमांगी | ३००/- |
| पुण्यभुषण | ३००/- |
| पुणे पोस्ट | १२०/- |
| ऊंसमळा | ४०/- |
| फुल टाईम पास | १००/- |
| फुल मनोरंजन | १००/- |
| उल्हास प्रभात | १००/- |
| समाज प्रतिबिंब | ३००/- |
| मिडिया वॉच | ३००/- |
| गोंदण | १५०/- |
| थिंक पॉझीटीव्ह | २५०/- |
| ॲग्रोवन* | २००/- |
| संवाद सेतू | २५०/- |
| शुभम | ३००/- |
| भवताल | ३००/- |
| आंतर भारती | ३००/- |
| कोकण मिडीया | २००/- |
| वास्तव | ३००/- |
| परन्तु | २००/- |
| प्रफुल्ल टाईमपास | १५०/- |
| फिल्मी बोलबाला | १५०/- |
| क्रांतीवीर | २००/- |
| समाजसुधारक | २००/- |
| शोध विज्ञानाचा | २००/- |
| बिईंग वुमन | २५०/- |
| आचार्य अत्रे | २५०/- |
| सँडवीच | २५०/- |
| अर्थकारण | २५०/- |
| खट्टामिटा | २२५/- |

सर्व रसिक-वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शब्दालय पुस्तकवारी – पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

वरील व इतर दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
90 11 20 1414

# ‘आधी कर्जबाजारी व्हायचं आणि मग कर्जमाफी मागायची’

## राधाकृष्ण विखे पाटलांची शेतकऱ्यांवर मुक्ताफळे

**प्रवरानगर :** आधी कर्जबाजारी व्हायचं आणि नंतर पुन्हा कर्जमाफी मागायची, हे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याची मुक्ताफळे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उधळली आहेत. गेल्या काही दिवसांपासून महायुती सरकारमधील मंत्र्यांसह नेत्यांची सुद्धा कर्जमाफीवरून शेतकऱ्यांवर बेताल वक्तव्ये करण्याची मालिकाच सुरु असून या यादीत आता विखे पाटील यांची भर पडली आहे. सोसायटी काढायची, कर्ज काढायचं, पुन्हा कर्ज माफ



करून घ्यायचं, आणि पुन्हा कर्जमाफीची मागणी करायची, हे अनेक वर्ष काम चालू असल्याचे विखे पाटील यांनी म्हटलं आहे. विखे पाटील यांच्यावर शेतकरी नेत्यांसह सोशल मीडियातून सडकून टीकेचा प्रहार झाल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर

### त्यांचा बोलण्याचा उद्देश वेगळा होता



बेताल विधानांबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सारवासारव करताना स्पष्ट केले की, विखे पाटील यांचा बोलण्याचा उद्देश वेगळा होता. त्यांनी सांगितले की महायुती सरकार शेतकऱ्यांचे कर्ज १०० टक्के माफ करणार आहे आणि आमचं सरकार कर्जमाफी करणार आहे. शेतकऱ्यांवर परत कर्ज होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे, असे बावनकुळे म्हणाले.

बावनकुळे यांनी त्यांच्या विधानावरून सारवासारव केली आहे. त्यांच्या या वक्तव्याचा किसान मोर्चाकडूनही चांगलाच समाचार घेण्यात आला आहे. किसन मोर्चाचे अजित नवले यांनी कर्जमाफीचे आश्वासन द्यायची आणि मतं घ्यायची असे म्हणत त्यांच्यावर निशाना साधला आहे.

### अजित नवलेंचा विखे पाटलांवर हल्लाबोल



अजित नवले म्हणाले की, राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांनाच दोषी ठरवण्याचं काम केलं आहे. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचे कर्ज सरकारी धोरणांचा परिणाम आहे. शेतकऱ्यांना लुटीची धोरणे राबवायची, आयात निर्यात धोरणे प्रभावित करायची आणि महागाईच्या नावाखाली भाव पाडायचे. शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी पिक विमा कंपन्यांचे नफे फुगवायचे हे सरकारचे धोरण आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. विखेंप्रमाणेच मंत्रीमंडळातील अनेक सहकारी अशाच प्रकारचे वक्तव्ये करत आहेत. निवडणुकीपूर्वी यांनीच कर्जमाफीची आश्वासनं द्यायची, मते घ्यायची आणि शेतकरी संघटनांनी तीच मागणी केल्यानंतर त्यांनाच प्रताडित करायचं हे चालू राहिलं, तर याचा प्रतिकार करावा लागेल.

# मधुमेह-लठ्ठपणा असलेल्यांना अमेरिकेचा व्हिसा मिळणे कठीण

**मुंबई :** मधुमेह, लठ्ठपणा आणि कर्करोग यांसारख्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना आता अमेरिकेत प्रवेश करणे कठीण होऊ शकते. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने शुक्रवारी जगभरातील अमेरिकन दूतावास आणि वाणिज्य दूतावासांना गंभीर आरोग्य समस्या असलेल्या लोकांना अमेरिकेत प्रवास करण्यास किंवा राहण्याची परवानगी देऊ नये असे निर्देश दिले.

हा नियम 'पब्लिक चार्ज' धोरणावर आधारित आहे, ज्याचा उद्देश अमेरिकन सरकारी संसाधनांवर अवलंबून राहू शकणाऱ्या स्थलांतरितांना रोखणे आहे.

त्यात व्हिसा अधिकाऱ्यांना अर्जदारांचे आरोग्य, वय आणि आर्थिक स्थिती तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अधिकाऱ्यांना दिलेल्या निर्देशात असे म्हटले आहे की अर्जदाराच्या आरोग्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. हृदयरोग, श्वसन समस्या, कर्करोग, मधुमेह, चयापचय रोग, न्यूरोलॉजिकल रोग आणि मानसिक आरोग्य समस्या यासारख्या वैद्यकीय परिस्थितींमुळे सरकारला लाखो डॉलर्सच्या काळजीची आवश्यकता निर्माण होऊ शकते, अशा लोकांना व्हिसा नाकारण्यात येणार आहे.

# संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या तारखा समोर


**मुंबई :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केंद्र सरकारच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार संसदेचं हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत होईल. संसदीय कामांची आवश्यकता पाहून हा अवधी वाढवला किंवा कमी केला जाऊ शकतो. केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी याबद्दलची माहिती दिली.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सरकार अनेक महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्याचा प्रयत्न करेल. घटनेत १२९ वी, १३० वी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडलं जाईल. त्यासोबतच जन विश्वास विधेयक, दिवाळखोरी विधेयकही संसदेत आणण्यात येईल. याआधी २०१३ मध्ये संसदेचं सर्वात लहान हिवाळी अधिवेशन झालं होतं. ५ ते १८ डिसेंबर या कालावधीत अधिवेशन संपन्न झालं होतं. केवळ १४ दिवसांच्या अधिवेशनात ११ बैठका झाल्या होत्या. इंडिया ब्लॉकमधील पक्षांनी एसआयआरवरुन रान पेटवलं आहे. त्याचे पडसाद आता संसदेत उमटू शकतात.

# बोपोडी जमीन घोटाळ्यांची सूत्रधार तेजवानी फरार

**पुणे:** पुणे शहरातील कोरेगाव पार्क येथील ४० एकर जमिनीचा गैरव्यवहार समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा थेट सहभाग आढळून आल्याने टीकेची झोड उठली आहे. याप्रकरणी सहजिल्हा निबंधक (वर्ग १) संतोष अशोक हिंगाणे यांनी बावधन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर जमीन विक्रेती शीतल तेजवानी, अमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय पाटील आणि सह-दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मुंढवा आणि बोपोडी येथील जमीन घोटाळ्यांची सूत्रधार मानली जाणाली शीतल तेजवानी सध्या फरार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

शीतल तेजवानी हिच्याविरोधात दोन गुन्हे दाखल झाले असून, तिचा मोबाईल बंद आहे. तसंच पोलिसांनी ती घरीही आढळून आलेली नाही. शीतल ही पतीसह देश सोडून पळून गेल्याचा पोलिसांना संशय आहे. बावधन पोलीस हे इमिग्रेशन विभागाकडे माहिती मागवून तिच्या परदेश प्रवासाची



खात्री करणार आहेत.

पुण्यातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात शितल तेजवानी हे एक महत्त्वाचे पात्र म्हणून समोर आलं आहे. ही जमीन बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या ताब्यात होती. शितल तेजवानीने ही जमीन सरकारच्या ताब्यातून सोडवण्यासाठी आणि विक्रीसाठी २७२ मूळ मालकांकडून नाममात्र पैसे देऊन कधीही रद्द न होणारी पॉवर ऑफ अटर्नी मिळवली. त्यानंतर तिने अमेडिया कंपनीला ही जमीन विकली. अमेडिया कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के आणि सुनेत्रा पवार यांचे भाचे दिग्विजय पाटील यांची १ टक्के भागीदारी आहे. वादग्रस्त शीतल तेजवानीचा इतिहास घोटाळ्यांचा राहिला असून, तिचा पती सागर सूर्यवंशी हा सेवा विकास सहकारी बँकेच्या घोटाळ्यातील आरोपी आहे. सागर आणि शितल यांच्यावर १०० कोटी रुपयांहून अधिक कर्ज असल्याचंही समोर आलं आहे.

# एसटी पेट्रोल पंप सर्वांसाठी खुले होणार : सरनाईक यांचा निर्णय

**मुंबई :** लवकरच सामान्य जनता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेल भरू शकेल. आपले उत्पन्न वाढवण्यासाठी, राज्य परिवहन महामंडळाने राज्यभरात २५० हून अधिक ठिकाणी पेट्रोल आणि डिझेलसह सीएनजी आणि इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंट्स असलेले किरकोळ विक्री पंप उघडण्याचा निर्णय घेतला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आजच्या काळात केवळ तिकिटांच्या उत्पन्नावर अवलंबून राहणे योग्य नाही. उत्पन्न मिळवण्यासाठी वेगवेगळे पर्याय निर्माण करण्याची आवश्यकता आहे. खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे, आम्ही इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना तसेच भारतातीलच नव्हे तर जगभरातील इंधन केंद्रांना २५० हून अधिक एसटी महामंडळाच्या ठिकाणी व्यावसायिक आधारावर एकात्मिक इंधन केंद्रे स्थापित करण्यासाठी आमंत्रित करत आहोत.

पान १ वरून

## तो व्यवहार रद्द करण्याची तरतूदच कायद्यात नाही...

पत्रकार परिषदेत ते म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये माझा मुलगा पार्थ पवार संचालक असलेल्या एका कंपनीच्या जमीन व्यवहारासंदर्भात काही बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानुसार मी संबंधित अधिकाऱ्यांशी तसेच पार्थशी सविस्तर चर्चा करून सर्व तथ्ये जाणून घेतली आहेत. मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की या व्यवहारात ना मी, ना माझे कार्यालय कोणत्याही टप्प्यावर सहभागी झालेले नाही. कोणताही फोन, मदत किंवा हस्तक्षेप झालेला नाही, असे अजित पवार म्हणाले. उपलब्ध माहितीनुसार हा फक्त जमीन खरेदीचा प्राथमिक करार आहे. पार्थ, त्याची कंपनी 'अमेडिया' किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडून विक्रेत्यास कोणतेही पैसे देण्यात आलेले नाहीत, तसेच जमिनीचा ताबा घेतलेला नाही. त्यामुळे हा व्यवहार अपूर्ण अवस्थेत असल्याचे त्यांनी सांगितले. पार्थच्या मते, प्रस्तावित व्यवहार कायदेशीर चौकटीत आणि पूर्ण पारदर्शकतेने पार पाडला गेला होता. मात्र, सार्वजनिक जीवनात आरोपांचा संशय देखील आपल्यावर होऊ नये, हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे काही गैरकृतीचे आरोप केल्यामुळे पार्थने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला असून विक्रीपत्र रद्द करण्याचे आवश्यक दस्तऐवज नोंदणी कार्यालयात सादर केल्याची माहिती अजित पवारांनी दिली.

मी आजवर सदैव कायदा आणि नियमांच्या चौकटीत राहून काम केले आहे. माझे प्रत्येक निर्णय हे न्याय, सत्य आणि वैधतेच्या मुल्यांवर आधारित असतात. हीच मुल्ये माझ्या कुटुंबीयांनाही लागू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, त्याचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि त्यांचे कुटुंबीय नेहमीच प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी या सर्वो च्च नैतिक निकषांचे पालन करत आल्याचे ते म्हणाले.

## १८०० कोटींची जमीन ३०० कोटीत

जमीन अनुदान प्रणाली होती. पूर्व महार समाजावर गावाचे संरक्षण करण्याची, संदेशवहन करण्याची आणि इतर कानी करण्याची जबाबदारी होती. या कामाच्या मोबदल्यात महार समुदायाला जमीन दिली जायची.

मात्र या पद्धतीमुळे महार समाजाचे शोषण होत असे, कठोर परिश्रम केल्यानंतर त्यांना कमी जमीन दिली जात असे, तसेच दिलेली जमीन अनेकदा परतही घेतली जात असे. यावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ही शोषणकारी व्यवस्था संपवण्यासाठी बॉम्बे इन्फेरियर व्हिलेज वतन निर्मूलन कायदा, १९५८ आणला. या कायद्याअंतर्गत सरकारने 'वतन' म्हणून मिळालेल्या जमिनी परत ताब्यात घेतल्या आणि काही अटी घालून पुन्हा त्यांच्या मालकांना देण्यात आल्या. सरकारने या जमीनी परत देताना काही अटी घातल्या होत्या, यातील एक अट अशी होती की, कलम ५(३) नुसार अशी जमीन सरकारी परवानगीशिवाय विकता किंवा हस्तांतरित करता येत नाही. आता पार्थ पवारांवर असा आरोप आहे की त्यांच्या कंपनीने सरकारी परवानगीशिवाय ही जमीन खरेदी केली आहे. याचाच अर्थ त्यांनी कायद्याचे उल्लंघन केले आहे. या व्यवहारासाठी उद्योग संचालनालयाने फक्त ४८ तासात स्टॅम्प ड्युटी माफ केली आणि अवघ्या २७ दिवसांत हा व्यवहार पूर्ण करण्यात आला. त्यामुळे पार्थ पवारांची अडचण वाढली आहे.

'माझा या प्रकरणाशी दुरान्वये देखील संबंध नाही. अशा चुकीच्या गोष्टी कोणीही करू नये अशा सूचना दिल्या होत्या. आता काही बातम्या येत आहेत. याची सगळी माहिती घेतो आणि नंतर बोलेल. मी आजपर्यंत कधीही नातेवाईकांना फायदा व्हावा यासाठी एकही अधिकाऱ्याला फोन केला नाही. 'माझ्या नावाचा वापर करून कोणी चुकीच काही करत असेल तर माझा पाठिंबा नसेल. मी कायद्याच्या चौकटी मध्ये राहून काम करणारा कार्यकर्ता आहे. 'मुख्यमंत्र्ययांनी चौकशी जरूर करावी, तो त्यांचा अधिकार आहे. 'मी सगळी माहिती घेतो आणि उद्या तुम्हाला संध्याकाळी भेटेल. सर्व गोष्टी नियमात झाल्या पाहिजेत. तो पत्ता पार्थ यांच्या नावावर आहे, माझ्या नावावर नाही. 'माझा कुठेही संबंध नाही. मुलं मोठी होतात ती त्यांचा व्यवसाय करतात. 'मी संविधानाला मानणारा माणूस आहे. मी कधीही चुकीच्या कामांना पाठिंबा देत नाही असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## जरांगे-मुंडे यांचे आरोप-प्रत्यारोप

कार्यालयात जाऊन नार्को टेस्टसाठी अर्ज करणार, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मंगळवारी (५ नोव्हेंबर) जालना पोलिसांनी दोन संशयितांना अटक केल्यानंतर हा कट उघडकीस आला. पोलिसांच्या माहितीनुसार, या कटामागे २.५ कोटी रुपयांची सुपारी होती.

जरांगे पाटील यांनी बुधवारी (६ नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत थेट धनंजय मुंडेंवर बोट ठेवले. मुंडेंनी माझ्या हत्येसाठी २.५ कोटींची सुपारी दिली. भाऊबीजच्या आधीच हा कट रचला गेला. यश न मिळाल्याने आता औषध किंवा गोळ्या देऊन घातपात करण्याचा विचार झाला. असा दावा करत त्यांनी एका ऑडिओ क्लिपचे प्रदर्शन केले. या क्लिपमध्ये कथितरित्या मुंडेंचा सहभाग दिसतो, ज्यामध्ये हत्येच्या कटाची चर्चा असल्याचे सांगितले जाते. यावेळी जरांगे पाटील यांनी मुंडेंच्या पार्श्वभूमीवरही टीका केली. मी जात-पात मानणारा नाही. पण ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता म राठ्यांना आरक्षण मिळावे, हेच माझे मत आहे. मात्र, मुंडे यांसारखे नेते समाजात फुट पाडत आहेत, असे ते म्हणाले. या आरोपांमुळे मराठा ओबीसी आरक्षण वाद पुन्हा एकदा तापला असून, सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पार्श्वभूमीः आरक्षण वाद आणि राजकीय षडयंत्र?

महाराष्ट्रात मराठा आरक्षणाची मागणी तीव्र आहे. जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने सरकारला १०% आरक्षण देण्यास भाग पाडले, पण ओबीसी समाजाने याला विरोध केला. धनंजय मुंडे हे ओबीसी नेते म्हणून आरक्षणाच्या मुद्यावर सक्रिय आहेत. संतोष देशमुख हत्याकांडात मुंडेंचा सहभाग असल्याचा आरोप झाल्यानंतरही ते राजकीय पटावर प्रभावी आहेत. या प्रकरणाने महाविकास आघाडी सरकारवर दबाव वाढला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही, पण भाजप नेत्यांकडून सीबीआय तपासाची मागणी होत आहे.

मुंडेंचे प्रत्युत्तरः कट रचणारे जरांगे यांचेच कार्यकर्ते जरांगेच्या आरोपांचे जोरदार खंडन करत मुंडे म्हणाले की, जरांगे पाटील यांच्यावर कट रचणारे, अटक झालेले आणि कबुली देणारे सर्वजण त्यांचेच कार्यकर्ते आहेत. मी असे कट रचणारा नाही. माझी ब्रेन मॅपिंग टेस्ट, नार्को टेस्ट करा आणि संपूर्ण प्रकरण सीबीआयकडे द्या. मुंडे यांनी जरांगे पाटील यांच्यावरच उलट आरोप करत म्हटले की, हे सर्व राजकीय षडयंत्र आहे. मी जात-पात मानणारा नाही. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळावे, हेच माझे मत आहे. आम्ही दोन्ही समाज एकत्र आणण्याचा प्रयत्न करतोय. मुंडे यांनी ऑडिओ क्लिपबाबतही शंका उपस्थित केली. ही क्लिप बनावट आहे. ती फसवी आहे. तपासात सत्य बाहेर येईल, असा दावा त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून मुंडे हे ओबीसी समाजाचे प्रमुख चेहरा आहेत, तर जरांगे पाटील हे मराठा आरक्षणः आंदोलनाचे प्रणेता. या दोघांमधील वादामुळे महायुती सरकार मधील अंतर्गत तणाव वाढवला आहे.

मुंडेंच्या पत्रकार परिषदेनंतर काही तासांतच जरांगे पाटील यांनी पुन्हा माध्यमांसमोर येऊन पलटवार केला. धन्या म्हणतात नार्को टेस्ट करा? चांगले ! मी उद्या स्वतः अर्ज करणार, तुम्हीही करा, सत्य बाहेर येईल, असे म्हणत त्यांनी मुंडेंवर उपहास केला. ऑडिओ क्लिप पुन्हा ऐकवत ते म्हणाले, हे ऐका, कट कसा रचला गेला. मुंडेंचा सहभाग स्पष्ट आहे. जरांगे पाटील यांनी पोलिस प्रशासनावरही टीका केली. जालना पोलिसांनी तात्काळ कारवाई केली, पण बीड पोलिस काय करत आहेत? मी उद्या मुंबईत गृहमंत्रालयात जाऊन तक्रार करणार, असा इशाराही त्यांनी दिला. जरांगे पाटील यांच्या सुरक्षेसाठी बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाने पातळी वाढवली आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी मुंडे विरोधात आंदोलनाची हाक दिली असून, ओबीसी समाजाकडूनही समर्थनाची मोर्चेबांधणी होत आहे.

## कृषी कर्जमाफी होणारच : कृषीमंत्री भरणे

अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

सहकारी बँकांचे आर्थिक वर्ष संपायच्या आत म्हणजेच जून २०२६ च्या आत कर्जमाफीचा घेतला जाईल, अशा शब्दात कृषिमंत्र्यांनी कर्जमाफीच्या घोषणेला दुजोरा दिला. मा. खा. कर्मबीर शंकररावजी काळे यांच्या १३ व्या पुण्यस्मरणा निमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व कर्मवीर

शंकरराव काळे मित्रमंडळाच्या वतीने कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'कर्मवीर कृषी महोत्सब २०२५ चे उदघाटन' राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पार पडले याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, आपण सर्वजण शेतकरी असून शेतकरी आपली जात आहे त्यामुळे शेती करताना आपण आजही जुन्या पद्धतीने शेती करतो परंतु त्यामध्ये आता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन कसं घेता येईल त्यासाठी शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. शेतकऱ्यांसाठी राज्याचा कृषिमंत्री म्हणून राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी माझ्यासारख्या कार्यकऱ्याला राज्याचे कृषिमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली. मला एवढं मोठ पद दिलं ते मिरवण्यासाठी नाही दिलेलं. माझ्या कृषी विभागाच्या माध्यमातून माझ्या शेतकऱ्याला अधिकचा न्याय कसा देता येईल हा माझा प्रयत्न आजही आहे आणि भविष्यामध्ये राहणार आहे. शेतकरी उभ्या केलेल्या पिकांबाबत अनेक स्वप्न रंगवतो परंतु कधी अतिवृष्टी होवून शेतकऱ्याच्या स्वप्नाचा चक्काचूर होतोय हे मी पहिले आहे अनुभवले आहे. त्यामुळे शेतकऱ्याचं दुःख आणि अडचणी याची मला कल्पना आहे. त्यासाठी शेतकरी बांधवांसाठी कुठले निर्णय घेणे गरजेचे आहे, कुठले निर्णय घेतल्यानंतर शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त लाभ कसा होईल यासाठी मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या सहकार्यातून शेतकऱ्यांच्या फायद्याचे निर्णय घेतले जाणार आहेत.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ड्रीपसाठी प्रति टन शंभर रुपये जादा भाव देत असल्याबद्दल आ. आशुतोष काळे यांचे कौतुक करतांना माजी आ. अशोकराव काळे यांना उद्देशन तुमचा चेअरमन लय हुशार आहे तुम्ही त्याला खूप हुशार केले असल्याचे सांगत तुम्ही शासनाच्या अगोदर शेतकऱ्यांना माणे दत करतात खरोखर कौतुकास्पद असल्याचे आहे. कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचा आदर्श इतर कारखान्यांनी घ्यावा असे आवाहन करून केंद्र व राज्य शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण योजनेचा जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. आशुतोषने शेतकऱ्यांच्या वेदना, व्यथा जाणून घेवून शेतकऱ्यांना शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा लाभ होवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी कर्मवीर कृषी महोत्सव २०२५ चे अतिशय सुंदर नियोजन केले आहे. त्याने मला जरी सांगितले नसले तरी, शेतकऱ्यांना अधिकचा फायदा व्हावा यासाठी यापेक्षा मोठे नियोजन करण्याची जबाबदारी मला आशुतोषवर द्यायची असून पुढील वर्षी होणारे अहिल्यानगर जिल्ह्याचे कृषी प्रदर्शन कोपरगावला होईल असे आश्वासनही केषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय-प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**


| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India Vision India MAKE IN INDIA MSME

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709


# मोदींनी काशीहून ४ वंदे भारत ट्रेन्सना हिरवा झेंडा दाखवला

## ही ट्रेन भारतीयांची, भारतीयांद्वारे भारतीयांसाठी बनवलेली असल्याचा केला उद्गार

**वाराणसी :** पंतप्रधान मोदींनी वाराणसीहून चार वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. ते म्हणाले, ''आता परदेशी प्रवासीही वंदे भारत पाहून थक्क होतात. वंदे भारत ही भारतीयांची, भारतीयांद्वारे भारतीयांसाठी बनवलेली ट्रेन आहे. आपण हे आधी करू शकलो असतो का? हे सर्व परदेशात होत असे. आता आपण ते करत आहोत; ते येथे बनवले जात आहे.''

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या भाषणाची सुरुवात ''नमः पार्वती पतये''ने केली. ते सुमारे १८ मिनिटे भाषण देत होते. त्यांनी उद्घाटन केलेल्या गाड्या वाराणसी आणि खजुराहो, फिरोजपूर आणि दिल्ली, एर्नाकुलम आणि बेंगळुरू आणि लखनऊ आणि सहारनपूर दरम्यान धावतील. ही वाराणसीची आठवी वंदे भारत ट्रेन आहे.

मोदींचा या वर्षीचा वाराणसीचा हा पाचवा आणि खासदार म्हणून त्यांचा ५३वा दौरा आहे. पंतप्रधान शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता वाराणसीत पोहोचले. ते विमानतळावरून बनारस रेल इंजिन फॅक्टरी गेस्ट हाऊसपर्यंत रस्त्याने प्रवास करत होते. २७ किलोमीटरच्या या मार्गावर भाजप कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी पंतप्रधानांचे स्वागत केले.



पंतप्रधान म्हणाले, ''शतकानुशतके, आपल्या भारतातील तीर्थयात्रा हे राष्ट्राच्या चेतनेचे अभिव्यक्तीचे साधन मानले गेले आहेत. या यात्रा केवळ दिव्य दृष्टीचा मार्ग नाहीत, तर भारताच्या आत्म्याला जोडणारी एक पवित्र परंपरा आहेत. प्रयागराज, अयोध्या, हरिद्वार, चित्रकूट आणि कुरुक्षेत्र सारखी असंख्य तीर्थक्षेत्रे आपल्या अध्यात्माची केंद्रे आहेत.''

''आज, ही पवित्र स्थळे वंदे भारत नेटवर्कशी जोडली जात असल्याने ती भारताची संस्कृती, श्रद्धा आणि विकास यांना जोडत आहे. भारतातील वारसा शहरांना देशाच्या विकासाचे प्रतीक बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. 'जगभरातील विकसित देशांमध्ये आर्थिक विकासाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांची पायाभूत सुविधा. आता, अशा क्षेत्राची कल्पना करा जिथे गाड्या जात नाहीत. तिथे रेल्वे लाईन बांधताच आणि गाड्या धावू लागताच, त्याचा विकास सुरू होईल.''

''किती विमानतळ बांधले गेले आहेत, किती वंदे भारत ट्रेन धावत आहेत आणि किती देशांमधून किती विमाने येत आहेत - हे सर्व महत्त्वाचे आहे. आज, भारत या बाबतीत वेगाने विकसित होत आहे. वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारतसारख्या गाड्या भारतीय रेल्वेच्या पुढील पिढीचा पाया रचत आहेत. भारतीय रेल्वेचे रूपांतर करण्यासाठी ही एक मोठी मोहीम आहे.''

---

# गंभीर आजारासाठी आता १० लाख मिळणार

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेत बदल; मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई :** सार्वजनिक आरोग्य विभागाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेत विविध प्रकारच्या २४०० आजारांसाठी मान्यता दिली. २३९९ आजारांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार होणार आहेत. तर, ज्या काही गंभीर आजारांसाठी अधिकचा खर्च होत आहे, त्यात १० लाख रुपये देण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक पार पडली. आजच्या बैठकीत काही मुद्द्यांवरुन चांगलीच खडाजंगी झाली. मंत्रिमंडळ बैठकीत आज पुन्हा मंत्र्यांनी प्रशासनाला धारेवर धरले, अजूनही पीडित शेतकऱ्यांना हवी तशी आणि हव्या त्या वेगाने मदत दिली.

शिवसेना आणि भाजपच्या मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत नाराजी व्यक्त केली. मागील कॅबिनेटमध्ये देखील अशीच नाराजी व्यक्त केल्याने मुख्यमंत्री यांनी प्रशासनाला खडसावले होते. मात्र, आजच्या कॅबिनेटमध्ये पुन्हा मदत पोहोचली नसल्याची तक्रार काही मंत्र्यांनी केली, फक्त मराठवाड्यात नाही तर कोकणात देखील भात पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे कोकणातील सेना भाजपच्या मंत्र्यांनी सांगितले, तिथे देखील मदत देण्याचे प्रशासनाला निर्देश बैठकीत देण्यात आले आहेत.

या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण २१ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या कर्जास शासन हमी देण्यास मान्यता. हुडको कडून घेण्यात येणारे हे कर्ज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चासाठी वापरणार आहे.

नागपूर येथील लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास निधी देण्यास मान्यता. सन २०२५-२०२६ ते सन २०२९-२०३० या कालावधीकरीता दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी चार हप्त्यात वितरीत करण्यात येणार आहे. यासह इतर निर्णयांचा त्यात समावेश आहे

# जरांगेंना मुंबई पोलिसांचं समन्स

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर आंदोलन करणारे मनोज जरांगे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी समन्स बजावला आहे. येता १० नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता त्यांना आझाद मैदान पोलीस ठाण्यात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकरणात पांडुरंग तारक, गंगाधर कालकुटे, चंद्रकांत भोसले, वीरेंद्र पवार आणि प्रशांत सावंत या चार जणांनाही समन्स पाठवण्यात आले आहेत.

२ सप्टेंबर रोजीच्या आंदोलनासाठी कोणतेही अधिकृत परवानगी न घेतल्याचा आरोप करत पोलिसांनी आझाद मैदान पोलीस ठाण्यात मनोज जरांगे पाटील आणि इतर सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता.

---


## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाकरिता ग्रंथनिवड समितीने शिफारस केलेल्या आणि ग्रंथालय संचलनालय, नगर भवन, मुंबई-२३ यांनी प्रकाशित केलेल्या यादीतील पुस्तकांची नावे

**सन २०२२**

१. १. अहमदनगर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे १८०/-
२. २. नाशिक जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे १३०/-
३. ३. पालघर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे ९०/-
४. ४. पुणे जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे १८०/-
५. ५. सिंधुदुर्ग जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे १३०/-
६. ६. सोलापूर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे १२०/-
७. २६. अपंग नव्हे अभंग / पुंडलिक गवांदे १६०/-
८. २७. स्वातंत्र्य संग्रामाच्या शौर्यकथा / विजय नांगरे २२०/-
९. २८. माझे दुसरे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ २२०/-
१०. २९. माझे तिसरे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ २२०/-
११. ३०. माझे चौथे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ २२०/-
१२. ३१. माझे पाचवे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ २२०/-
१३. २१०. अक्षय उर्जा माहिती, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र / वैभवकुमार शिंदे १७०/-
१४. २११. अभ्यासाची खोली / दत्ता केंगे ७०/-
१५. २१२. मला मोठ्ठं व्हायचंय / दत्ता केंगे ८०/-
१६. २४५. आम्ही छोटे शेतकरी शेतीला जोडधंदे / एस. के. पाटील ८०/-
१७. २४६. आफ्रिकन लोककथा अनांसीच्या कथा / स्मिता मुजुमदार ८०/-
१८. २४७. कित्तूरची राणी चेन्नम्मा / स्मिता मुजुमदार ८०/-
१९. २४८. पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकर / स्मिता मुजुमदार ८०/-
२०. ३५५. तुकाराम : अहिराणीत निरुपण / एस. के. पाटील ५२५/-
२१. ३५६. कादंबरीतील नवता / इंद्रजित वीर ५५०/-
२२. ३५७. लोकसाहित्याची चिकित्सा / नवनाथ शिंदे ६००/-
२३. ३५८. अधोरेखित अक्षरे / सुरेखा सबनीस ३५०/-
२४. ३५९. हिन्दोल / संध्या शहापुरे २५०/-
२५. ३६०. बारदाणा / संजय जगताप २४०/-
२६. ३६१. सामूहिक सक्षमीकरणातून ग्रामविकास / प्राजक्ता लवंगारे २००/-
२७. ३८२. निर्धार प्लास्टिक प्रदूषण मुक्तीचा / पुंडलिक गवांदे २००/-
२८. ३८३. प्राण्यांचे संदेश / पुंडलिक गवांदे २२०/-
२९. ३८४. विज्ञान कोडे / ताई पवार २४०/-
३०. ५२५. गोतावळा व्यक्तिचित्रे / श्रद्धा बेलसरे २२०/-

**सन २०२२**

१. ९८५ माझं घर / जयंत पवार रु. १६०
२. ४२० पक्षांची ओळख / पुंडलिक गवांदे रु. २५०
३. ४१० विज्ञान कोडे / ताई पवार रु. १४०
४. ३९१ अक्षय उर्जा / वैभवकुमार शिंदे रु. १७०
४. ४२४ बहुगुणी वनस्पती / हरिपाद आजरेकर रु. १००
५. ६७८ साहित्य आणि अस्तित्वभान भाग - २ / दिलीप चित्रे रु. १०००
६. ६९५ भारतीय साहित्यशास्त्र सिद्धांत आणि समिक्षा / भरतकुमार भालेराव रु. २००
७. ४१८ कुब्र / सत्यजीत पाटील रु. २३०
८. १११३ डिळी / सुचिता खल्लाळ रु. २९०

**सन २०२१**

१. २३८३ झाडाची गोष्ट / शालमल लांडे रु. ६०
२. २२२८ मी अब्दुल कलाम / मृण्मयी पाटील रु. ६५
३. २२३० आनंद गाणी / स्नेहा पाटील रु. ६०
४. २२५४ अंतराळाचे स्वप्न व इतर गोष्टी / संज्यात बानुबाकोडे रु. ६५
५. २३०३ बी ची गोष्ट / सुनिल भोंडगे रु. ५०
६. ३६५ मानवी इंजिन आणि त्याचे इंधन / यु. डी. चव्हाण रु. ६७५
७. १२७८ तिचा अवकाश / वंदना महाजन रु. ३००
८. २११४ बेस्ट फ्रेंड / विशाल तायडे रु. ९०
९. ७२० स्त्री कुसाच्या कविता / लक्ष्मण महाडिक रु. १२५
१०. ७६६ नवसंवेदन / नीळकंठ शेरे रु. २७०

**सन २०२०**

१. ३६८ योग खेळ, छंद आणि संस्कार/आनंद वाघ रु. २५०
२. ३९८ जल उर्जा/संदीप लांडे रु. १००
३. ४४५ स्त्रीवाद आणि १९७५ नंतरची मराठीतील आत्मचरित्रे/भरतकुमार भालेराव रु. ७००
४. ४८४ काव्याचा भावार्थ/नीलिमा गुंडी रु. ३७०
५. ५०२ ज्याचा त्याचा चांदवा/अंजली ढमाळ रु. २२०
६. ५३२ दंडविधान/मनोज पाठक रु. २७०
७. ५५० जगण्याच्या कोलाहलात/गणेश मरकड रु. २००
८. ६१३ कोयतूर/विनोद कुमरे रु. ३२०
९. ६९७ आहेच वेगळी/राजेंद्र मलोसे रु. ४००
१०. ९९६ रंग जीवनाचे/बबन काकडे रु. २५०
११. १४८६ निसर्गाचे संवर्धन का करावे?/अभास भारध्वाज रु. १७५
१२. १५१० आपले हरित घर/संदीप लांडे रु. १००
१३. १५१६ जग बदलणारे ५० शोध/आनंद वाघ रु. १००
१४. १५२१ चला पावसाच्या पाण्याची बचत करू या/संदीप लांडे रु. १२५
१५. १५१५ पोक्सो कायद्याचे स्वरुप आणि बालकांचे संरक्षण /सुमती लांडे रु. २५
१६. १६५२ स्त्रीवाद आणि १९७५ नंतरची मराठीतील आत्मचरित्रे/भरतकुमार भालेराव रु. ७००

**सन २०१७**

१७. १०२ पोलीस भरती मार्गदर्शक व ५० प्रश्नसंच १८०.००
१८. ५२४ मराठी वाङ्मय प्रकार : स्वरुप, संकल्पना व वाटचाल ४००.००
१९. ५७३ मराठी गझल : प्रवाह आणि प्रवृत्ती २६०.००
२०. ६१७ दुभंगवाणी १५०.००

**सन २०१६/१७**

२१. ११ देशमुख धनंजय/ पंचायत राज २००.००
२२. १२ धनंजय देशमुख / सामान्य विज्ञान २५०.००
२३. ४७० दिलीप धोंडगे /हरवले गाव २५०.००
२४. ५९१ सूर्यवंशी अभिमन्यू /स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप २००.००
२५. ३४८ अडसूळ श्रीकृष्ण/गोमंतकीय साहित्य २५०.००
२६. ३७४ शिखरे गोकुळ/साहित्य आणि समाज एक आकलन १८०.००
२७. ३९५ कांबळे रविंद्र/ काव्यभाव १००.००
२८. ४५६ हिरवे विनायक/ सूर्य गेला नाही अजून अस्ताला १५०.००
२९. ६४८ कार्व्हालो सिसिलिया/ पैंजणांचे झाड १५०.००
३०. ६८९ जोंधळे महावीर/ साळुंकीची सावली १८०.००
३१. ७३७ चावडे कैलास/जखमी पावलांचे ठसे १२०.००
३२. ८२३ मुलमुले नंदू/ दुभंगवाणी १५०.००

**सन २०१५**

३३. १४ जोशी स्मिता /पोलीस भरती मार्गदर्शन १५०.००
३४. ३८१ लिला गोविलकर /मराठीचे व्याकरण ३००.००
३५. ३८४ नगरकर शेकडे /व्यावहारिक मराठी ८०.००
३६. ५२३ खल्लाळ सुचिता/स्त्री लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा २६०.००
३७. ५३० घोणसे शामा /मराठी विरशैव वाङमयःएक अवलोकन १५०.००
३८. ५५० पाटील आशुतोष /स्त्री लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा २६०.००
३९. ५७१ वाघमारे राम/समकालिन कादंबरीकार नेमाडे आणि पठारे ४८०.००
४०. ५७७ शिंदे विश्वनाथ /पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य २६०.००
४१. ५७८ शेकडे वसंत / निवडक नागनाथ कोतापल्ले १२०.००
४२. ५९८ सिसीलिया कार्व्हालो /माणूस उकरुन काढावा लागतोय २००.००
४३. ७२३ शेकडे वसंत /निवडक कविता १००.००
४४. ८०३ कोरपे आप्पा /मी तो हमाल १५०.००

**सन २०१४**

४५. २८७ कुबल रमेश /लोकसाहित्याचे अंतरंग २००.००
४६. २९५ तापस-राजापुरे पुष्पलता/ कोकणातील लोककला २५०.००
४७. ३०८ पठारे रंगनाथ /आजची कादंबरी नोंदी आणि निरीक्षणे ३२०.००
४८. ३०९ पठारे रंगनाथ /संचित व संघर्ष ४४०.००
४९. ३१२ बागले प्रभाकर /साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन ५००.००
५०. ३३२ कांडर अजय / आवानओल १००.००
५१. ३६० बांदेकर प्रविण/ येरु म्हणे १००.००
५२. ४२२ शिंदे उज्वला /बाईचं घर मेणाचं २९०.००
५३. ४७० करंजीकर दीपक /आजच्या विश्वाचे आर्त ३००.००
५४. ५३३ धोंडगे दिलीप /चिंतनासी न लगे वेळ ३५०.००
५५. ९३६ शिंदे विश्वनाथ / शाहिरी वाङमयाच्या धारा २४०.००
५६. ९६१ पठारे रंगनाथ /चोषक फलोद्यान ३७५.००

**सन २०१२**

५७. ४५८ डॉ. दिलीप धोंडगे/ तुका म्हणे भाग १ ७००-००
५८. ४५९ डॉ. दिलीप धोंडगे/ तुका म्हणे भाग २ ७००-००
५९. ४६६ निरगुडकर भारती/ २००-००
६०. ५१० शेळके भास्कर/मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरुप आणि विश्लेषण ४५०-००
६१. ५८१ लांडे सुमती/ कमळकाचा ३५०-००
६२. ८३४ दराडे उषा/ कुंकवाच्या पलिकडे २००-००
६३. १०१२ शेळके भास्कर / ग्रंथवेध ३२०-००

**सन २०११**

६४. ८०८ पाटेकर ऐश्वर्य/भुईशास्त्र २२०-००
६५. ८१५ बारहाते लक्ष्मण/ ८०-००
६६. ८२२ महानोर ना. धों. पाच बिधे बालकवींच्या निवडक कविता ११५-००
६७. ९९४ डंबीर नीता /वसा पर्यावरणाचा १२०-००

**सन २०१०**

६८. ६५ चित्रे दिलीप पुरुषोत्तम/तुकोबांचे वैकुंठगमन १००-००
६९. ३६१ चित्रे दिलीप पुरुषोत्तम/अगतिकांचे जागतिकीकरण १८०-००
७०. ४७१ पाटणकर जयश्री/संशोधनाची क्षेत्रे व पद्धती २६०-००
७१. ६५५ इंगळे अशोक रा. /आंबेडकरी साहित्यातील जीवनमूल्ये ८०-००
७२. ७०२ राजापुरे-तापस पुष्पलता/१९८० नंतरचे स्त्रीनिर्मिती कथनपर साहित्य ३४०-००
७३. ७३९ गुरव धनाजी/तुर्तास समजावून घेताना १४०-००
७४. ८४८ कर्णिक मधू मंगेश/भाकरी आणि फूल ३००-००
७५. १०७३ चित्रे दिलीप पुरुषोत्तम/ ऑर्फियस / १३०-००
७६. १२५९ चित्रे दिलीप पुरुषोत्तम/तिरकस आणि चौकस १५०-००
७७. १५४८ पाटील अशोक (संपा.)/ शेतकऱ्यांचे शरद पवार ७५०-००

**सन २००९**

७८. ६७१ लुलेकर प्रल्हाद/ भंजनाचे भजन १२०-००
७९. ६७६ डॉ. शेळके भास्कर/प्रा. साळवे/समीक्षा संकल्पना-स्वरुप १५०-००
८०. ६७८ सद्रे केशव (संपा.)/ सुषमा करोगल/आणिक टीकास्वयंवर २८०-००
८१. ६७९ सातपुते पोपट/प्रा. शेळके/चळवळ व साहित्य ५००-००
८२. ७३१ पावसकर रामकली/ओले अथांग श्वास १००-००
८३. ७७३ चित्रे/पठारे/प्रत्यय आणि व्यत्यय १८०-००
८४. ८३२ कदम महेंद्र/धुळपावलं ३००-००
८५. ९०२ बांदेकर प्रवीण दशरथ/चाळेगत ६५०-००
८६. ९४४ समर खडस/बकऱ्याची बॉडी २८०-००
८७. १००७ जाधव मधू/कथाविविधा १५०-००
८८. १०१० जोशी चि. वि./ जातकांतील निवडक गोष्टी ४००-००
८९. १०२२ दराडे उषा/आभाळाच्या आरपार १५०-००
९०. १०२६ देशमुख सदानंद/उठावण ११०-००

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे Total Code - SR.NO./MAG/11/2021